# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक १३.०७.२०२६ सोमवार**

**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा गौरव :—**

मा. श्री विश्वास नांगरे, पाटील पोलीस, आयुक्त नागपूर शहर यांनी आज दिनांक १३.०७.२०२६ चे १२.०० वा. पोलीस भवन येथील सभागृह येथे, नागपूर शहर पोलीस दलातील नजीकच्या काळात उत्कृष्ट कार्य केलेल्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा आयोजीत छोटेखानी समारंभात प्रशस्तीपत्र देऊन त्याचे उल्लेखनिय कार्याचा गौरव केला.

गुन्हेशाखा युनिट क्र. ३ पोलीसांनी तांत्रिक कौशल्य तसेच गोपनिय यंत्रणेचा उत्कृष्ट वापर करुन पोलीस ठाणे लकडगंज येथे दाखल अकस्मात मृत्युचे चौकशी दरम्यान प्राप्त माहितीवरुन, समातंर चौकशी करुन सदर प्रकरण हे अकस्मात मृत्यूचे नसून जबरी चोरी करण्याचे उद्येशाने खुन असल्याचे निष्पन्न करुन आरोपींना शिताफीने अटक केली व गंभीर तसेच क्लिष्ट गुन्हयाची उकल केली. तपासामध्ये गुन्हेशाखा युनिट क्र. ३ चे पोनि अतुल मोहनकर, पोउपनि मधुकर काठोके, पोहवा विजय श्रीवास, पोअं. दीपक लाखडे, दीपक दासरवार, जितेश रेड्डी, सहदेव चिखले, चंद्रशेखर डेकाटे यांचा समावेश आहे.

गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा विभाग पोलीसांनी तांत्रिक कौशल्य तसेच गोपनिय यंत्रणेचा उत्कृष्ट वापर करुन, ''लॉग—इन पर्सनल मिटींग'' या ॲपद्वारे देहव्यवसाय करणाऱ्या रॅकेटचा भंडाफोड करुन आंतरराज्यीय व विदेशी पिडीत महिलांची सुटका केली तसेच कोंबीग ऑपरेशन दरम्यान, अग्निशस्त्र, काडतुस, तलवार असा शस्त्रसाठा जप्त केला, ज्यामध्ये गुन्हेशाखेचे पोलीस निरीक्षक श्री दर्शन पाटील, पोहवा प्रकाश माथनकर, राम निरगुडवार, मपोहवा आरती चव्हाण, नापोअं. शेषराव राऊत, अश्विन मांगे, समिर शेख, नितीन वासनिक, कुणाल मसराम, मपोअं, पुनम शेंडे, अश्विनी खोडपेवार यांचा समावेश आहे.

खापरखेडा पोलीसांनी आत्महत्या करण्याचे उद्येशाने घर सोडून गेलेल्या व्यक्तिकरीता शोध मोहीम राबवून तांत्रिक कौशल्य व समन्वयाने त्याचा शोध घेऊन त्याला आत्महत्येपासून परावृत्त करुन सुरक्षितपणे त्याचे नातेवाईकांचे स्वाधिन केले, ज्यामध्ये पोलीस ठाणे खापरखेडा येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री हरीष रुमकर, पोहवा गजानन राजुरकर, पोअं. हेमराज गांजरे, रणजीत राठोड, सचिन तांगडे यांचा समावेश आहे.

मा. पोलीस आयुक्त यांनी पोलीस अधिकारी व अंमलदार यांना समर्पण भावनेने व प्रामाणिकपणे कर्तव्य बजावण्याचे आवाहन केले. सन्मानित अधिकारी व अंमलदार यांनी या सन्मानामुळे उत्साह वर्धीत झाल्याची व त्यामुळे अधिक जबाबदारीने नागरिकांचे सेवेसाठी कार्य करण्यास प्रेरीत झाल्याची भावना व्यक्त केली.






**(कामगिरी)**

**गिट्टीखदान पोलीसांची कामगीरी :— घरफोडी करणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक १०.०६.२०२६ चे १८.०० वा. ते दिनांक ११.०६.२०२६ चे ०९.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत, प्लॉट नं. २०४, ओम सोसायटी, जगदीशनगर, दाभा रिंग रोड, नागपुर येथे राहणारे फिर्यादी कपिल छत्री शाहू वय ३६ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह देवदर्शनाकरीता तिरुपती, आंध्रप्रदेश येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे गेटचे व मुख्य दाराचे कुलूप तोडून, आत प्रवेश करुन, बेडरुममधील कपाटातील रोख ४,३५,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ७,२१,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान गिट्टीखदान पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी १) असलम अझर काझी वय २४ वर्षे रा. प्लॉट क्र. ७३, मिसाळ ले आऊट, पाटणकर चौक, जरीपटका, नागपुर २) तेजस धीरज लोणारे वय २५ वर्षे, रा. लाईन क्र. १, माया नगर, इंदोरा, जरीपटका, नागपुर यांना ताब्यात घेतले. आरोपींना विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपींचे ताब्यातुन सोन्याचे दागिने ३५ ग्रॅम, चांदीचे दागिने ७५३ ग्रॅम, पॅशन प्लस मोटार सायकल क्र. एमएच ३१ सीवाय २८७६ असा एकुण १,९५,२४०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त, मा. श्रीमती विनीता शाहू, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंग, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. २), मा. श्री. सत्यवीर बंडीवार, सहा. पोलीस आयुक्त (सदर विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, मवपोनि. श्रीमती ललिता तोडासे, पोनि. गुन्हे देवाजी नरोटे, सपोनि. चेतन बोरखेडे, पोउपनि

दीपक इंगळे, सफौ. अनिल त्रिपाठी, पोहवा. अजय यादव, दिनेश आगरकर, रविंद्र भुजाडे, विश्वास बलादे, विशाल नांदेकर, मंजीत सिंग, दयाशंकर बिसांद्रे, अविनाश पाटील, जयराम पंडीत पोअं. नागनाथ कोकरे, आकाश लोथे, नितीन रंगारी, नितेश वाकडे, घनश्याम बोरकर, राहुल पांडे, अविनाश पांडे, सचिन खडसे यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे कळमणा :— जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणारा आरोपी अटकेत.</u>**

फिर्यादी सौ. सिमा सुनिल सतनामे वय ३० वर्ष रा. उमरिया, इसरा जि. छिंदवाडा, मध्यप्रदेश ह.मु. वांजरा, काच कंपनीजवळ, नागपूर यांचे पती सुनिल किशोरी सतनामे वय ४० वर्ष हे विटाभट्टीमध्ये मजुरी काम करतात. त्यांचे सोबत हिमांशु उर्फ गुड्डु गुरुदेव सोनटक्के वय २८ वर्ष रा. इंदीरा माता नगर, बिनाकी ले आऊट, नागपूर हा सुध्दा मजुरी कामे करतो. दिनांक १२.०७.२०२६ वा. चे १२.०० वा. चे सुमारास पोलीस ठाणे कळमणा हद्दीत, बबलु खान यांचे विटाभट्टी, पार्वतीनगर, कळमणा येथे फिर्यादीचे पती व सोबत काम करणारा हिमांशु यांचेमध्ये काही कारणावरुन भांडण झाले असता, आरोपी हिमांशु याने फिर्यादीचे पतीस जिवे ठार मारण्याचे उद्येशाने त्यांचे डोक्यावर फावडयाने मारुन गंभीर जखमी करुन पळून गेला. गंभीर जखमी यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे अतिदक्षता विभागात दाखल केले आहे, उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमणा येथे पोउपनि गिराम ९२८४९८२९३५ यांनी आरोपींविरूध्द कलम १०९(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करून, त्वरीत दखल घेवुन, आरोपींचा शोध घेवुन, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे कोराडी</u> :—** निखील तुकाराम आमले, वय ३० वर्षे, रा. प्लॉट नं. २१, बजरंग नगर, नशेमन हाऊसिंग सोसायटी, कोराडी, नागपूर हे दिनांक ०६.०७.२०२६ चे १०.३० वा. पोलीस ठाणे कोराडी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— मजबूत, उंची— ५ फुट ९ इंच, केस— काळे, अंगात— पांढऱ्या रंगाची टि—शर्ट व ग्रे रंगाचा फुल पॅन्ट तसेच पायात चप्पल घातलेली आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**<u>२) पोलीस ठाणे कोराडी</u> :—** विश्वास अनंतराम गौतम, वय २३ वर्षे, रा. घरसंसार सोसायटी, नंदनवन, नागपूर हे दिनांक ०३.०७.२०२६ चे ०९.४० वा. पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— मध्यम, उंची— ५ फुट ५ इंच, केस— काळे, अंगात— निळ्या रंगाची टि—शर्ट, कॉलर निळ्या रंगाची व निळ्या रंगाचा लोअर पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**<u>३) पोलीस ठाणे जरीपटका</u> :—** क्षितीज शंकर फुलझेले वय ४८ वर्षे, रा. जैतवन बुध्द विहारामागे, जरीपटका, नागपूर हे दिनांक ०७.११.२०२५ चे १०.०० वा. पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग— गोरा, चेहरा—लांब, बांधा—मजबुत, उंची— ५ फुट ८ इंच, केस— काळे, अंगात— काळया रंगाचा शर्ट व पॅन्ट घातलेली आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**<u>४) पोलीस ठाणे जरीपटका</u> :—** सौ. ललिता रामलाल टकोरिया वय २८ वर्षे, रा. भिमचौक, जरीपटका, आसिफ चे घरी किरायाने, नागपूर हया दिनांक ०९.०७.२०२६ चे १०.०० वा. पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>** रंग—सावळा, चेहरा—लांब, बांधा—मजबुत, उंची— ३ फुट, केस— काळे, अंगात— साडी घातलेली आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळखचिन्ह— पायावर गोंदलेले आहे.


निखील


विश्वास


क्षितीज


सौ. ललिता

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**